।। श्री गजानन प्रसन्न ।।
।। श्री केशवराज प्रसन्न ।।

Book Packet Containing
Periodical

R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

## आपली आहे प्रगतीची

# वाटचाल

* वर्ष १५ वे, अंक १ ला * दि. १५ मार्च २०१५ * किंमत रु. २०/-



गुढी प्रेमाची उभारुया मनी
औचित्य शुभमुहूर्ताचे करुनी ...
विसरुनी जाऊ दु:ख सारे
स्वागत करुया नववर्षाचे प्रेमभरे

## गुढीपाडवा आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

# अध्यक्षीय मनोगत

प्रिय बंधू भगिनीस, सप्रेम नमस्कार,

सन २०१५ हे नवीन वर्ष सुरू होऊन आता तीन महिने होत आले. पण ह्या वर्षीचा हा पहिलाच अंक असल्याने 'हे वर्ष आपणा सर्वांस आनंदाचे जावो' अशी प्रार्थना करतो.

नवीन वर्ष म्हणजे नवीन संकल्प. ह्या वर्षी नेहमी प्रमाणे अनेकांनी विविध संकल्प केले असतील. ते पूर्ण करण्यात त्यांना यश येवो व बळ मिळो ही प्रार्थना.

आपली वेबसाईट www.deodharmandal.org ही गेले ४ वर्षे बंद झाली होती. ती सर्व नवीन माहितीसह पुनर्जिवित करण्यात मंडळाचे प्रयत्न यशस्वी होतील व हा अंक आपणास मिळेपर्यंत ते काम पूर्ण झाले असेल अशी आशा करुया.

काळ सतत बदलत असतो व जी गोष्ट पाच वर्षांपूर्वी अती महत्त्वाची वाटे ती आता कवडीमोल होऊ शकते. उदा. व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डर (V.C.R.) आता ते सर्व भंगारात गेले. कॉम्पॅक्ट डिस्क (C.D.) पण थोडे दिवसात भंगारात जाणार आहेत. आता छोटे, बोटांच्या पेराएवढे ''पेन ड्राइव्ह'' ६० गेगा बाईट (GB) एवढा प्रचंड मजकूर साठवला जाऊ शकतो. म्हणजेच आपला संपूर्ण कुलवृत्तांत त्यात साठवू शकतो. मग अडीच किलो वजनाचा कुलवृत्तांत (१९९२ ची प्रत) कोण हाताळणार? म्हणून मंडळाने नवा कुलवृत्तांत आपल्या वेबसाईटवर टाकण्याचे ठरविले आहे. त्यामुळे तो हवा तेथे (जगांत कोठेही) हवा तेव्हा पाहता येईल. आपल्याला हवी असलेली माहिती नाव/घराणे वगैरे देऊन शोधून काढता येईल. त्याची नक्कल पेन ड्राइव्ह किंवा इतर गॅजेटवर करून घेता येईल. सर्वांचं सहकार्य अपेक्षित आहे.

नेहमीप्रमाणे ह्या वर्षी तीळगूळ समारंभ पुणे येथे १८-१-२०१५ व डोंबिवली येथे १-२-२०१५ रोजी छान प्रकारे पार पडले. त्याची माहिती अंकात इतरत्र आली आहेच. जास्तीत जास्त सभासदांनी व त्यांच्या कुटुंबियांनी ह्यात सहभागी व्हावे व कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवावा अशी विनंती आहे.

मंडळाच्या कामामध्ये आपणा सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे. वाटचालसाठी लेख, कविता, प्रवास वर्णने पाठवून आपण अंक सजवू शकता. चित्र पाठविताना ते आपले नाव व फोटो सहीत द्या. अंक वाटपाचे काम आपण येता जाता करू शकतो. त्याने पोस्टाचा खर्च कमी होईल व अंक लवकर मिळतील. वाटचालसाठी देणगी देऊ शकता.

त्याचप्रमाणे वार्षिक सभेस उपस्थित राहून आपले विचार, सूचना मांडून आपण मंडळास मार्गदर्शन करू शकता. आपल्या कुटुंबात घडणारे आनंदाचे/दु:खाचे क्षण, अनुभव आम्हास कळवून आम्हास त्यात सहभागी करू शकता. आपल्या पाल्याने शिक्षणात, खेळात अगर कोणत्याही विषयात खास प्रावीण्य मिळविले असेल ते आम्हास कळविल्यास त्याचा यथोचित सत्कार करण्यास आम्हास आनंद होईल.

सभासद वर्गणी व विशेष कारणासाठी दिलेली देणगी मंडळाच्या खर्चासाठी वापरता येत नाही. उदा. शिक्षण निधी, साकवसाठी निधी, वाटचाल निधी वगैरे. ह्या देणग्यांवरील व्याज त्या कार्यासाठी वापरले जाते. तेव्हा आपण दिलेल्या देणग्या मंडळास आवश्यक आहेत.

आपणा सर्वांचा सहभाग अपेक्षून मनोगत संपवतो.

***

# तीळगूळ समारंभ - मुंबई विभाग

देवधर - दीक्षित - ढमढेरे कुलबंधु / भगिनींचा वार्षिक तीळगूळ समारंभाचा कार्यक्रम रविवार दि. १/२/२०१५ रोजी ठीक ५ ते ७.३० या वेळात कानविंदे सभागृह, पहिला मजला, पेंडसेनगर, डोंबिवली (पूर्व) येथे आयोजित करण्यात आला होता.

प्रथम कार्यवाह सौ. सरिता देवधर यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत केले. नंतर दीपप्रज्ज्वलन करण्यासाठी मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वा. ना. देवधर, श्री. सुरेश देवधर, मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. दिलीप देवधर, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. अविनाश देवधर व उज्जैनहून कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले श्री. शाम ढमढेरे या सर्वांना विनंती करण्यात आली. त्याप्रमाणे सर्व मान्यवरांनी दीपप्रज्ज्वलन करून श्री केशवराज व श्री परशुराम यांच्या प्रतिमांचे पूजन केले. सौ. सुगंधा देवधर (डोंबिवली), डॉ. प्राजक्ता देवधर, सौ. मीरा काळे (डोंबिवली), यांनी श्री केशराजाची व श्री परशुरामाची आरती म्हटली आणि कार्यक्रमाची वातावरण निर्मिती झाली. नंतर कार्यवाहांनी मंडळातर्फे होत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. नंतर दिवंगताना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

त्यानंतर श्री. अविनाश देवधर यांनी 'आयुर्वेद आणि आपण' ह्या विषयावर एक तास अत्यंत माहितीपूर्ण व्याख्यान दिले.

सुरुवातीलाच त्यानी आजची सामाजिक परिस्थिती, बदललेली कुटुंबव्यवस्था, तणावपूर्ण, व्यस्त आणि व्यग्र जीवनशैली, खाण्याच्या बदललेल्या वेळा, ताणतणाव यावर भाष्य केले. कोलमडणारी एकत्र कुटुंबव्यवस्था establish करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे हे त्यानी आवर्जून सांगितले.

संक्रांतीच्या काळात निसर्गत:च सगळीकडे थंड वातावरण असते. हवेत गारठा असतो. अंतर्गत उष्णता निर्माण होण्यासाठी तीळगूळ खाणे गरजेचे असते. तैलजन्य पदार्थातून मिळणारी उष्णता ही दीर्घकाळ टिकणारी असते म्हणून या सणाला तीळगूळ खाणे, गूळपोळी खाणे शरिराला हीतकारक असते.

आपल्या पूर्वजांनी प्रत्येक सणाला, प्रत्येक व्रत-वैकल्याला धर्माचं तसेच संस्कृतीचं अधिष्ठान दिले आहे. उदा. आपण गुढीपाडव्याला कडुलिंबाची पाने खातो. त्याबरोबर जिरे खाल्ले तर उन्हाळ्यात होणारे कातडीचे रोग, मूत्राशयाचे आजार होत नाहीत. म्हणून ही पूर्वतयारी prevention is better ही त्या मागची भूमिका. उठसूठ डॉक्टरांकडे जाणे आयुर्वेदाला मान्य नाही. आयुर्वेद हा निसर्गाबरोबर जाणार वेद आहे. निसर्ग कायम तुम्हाला देत असतो. ज्यावेळी तुम्ही निसर्गाचं संवर्धन कराल, त्याला द्यायला शिकाल, तरच मग निसर्ग तुम्हाला भरभरून देईल. निसर्गातील प्रत्येक वनस्पती कुठल्या ना कुठल्या रोगावर उपचार करणारी आहे. आणि हे परदेशातील लोकांनी जाणले आहे. आपला शेजारी देश चीन. चीनने काही लाख हेक्टर जागेत कडुलिंब, करंजा, या वनस्पतींची लागवड

केली आहे.

आयुर्वेदाने तर आपल्याला घरापासून संस्कार दिले आहे म्हणून घरात भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा ह्या अतिशय महत्त्वाच्या गोष्टी आहेत. तैलमर्दन करून जर तुम्ही सूर्य प्रकाशात बसलात तर डी जीवनसत्व उत्तम मिळते. आपण देवाची पूजा करतो. गणपतीला दुर्वा, शंकराला बेल, विष्णुला तुळस वाहतो. दुसऱ्या दिवशी निर्माल्य म्हणून फेकून देतो. असे न करता ते जर पाण्यात टाकून दुसऱ्या दिवशी ते पाणी सर्वानी प्यायले तर शरीरातील रसनिर्मिती करणाऱ्या ग्रंथी चांगले काम करतात. दुर्वांचा उपयोग मज्जासंस्थेसाठी होतो. आपण मारुतीला रुईच्या पानांचा हार घालतो. ही रुईची पाने औषधी आहेत. रुईच्या पानांचा अर्क हा कातडीच्या रोगांवर उत्तम उपचार आहे. इतकेच काय आपल्या घरातल्या सर्व गोष्टी औषधी आहेत. फोडणीला वापरतो ते धने-जिरे अतिशय थंड आहे. उन्हाळ्यात जर धने, जिरे काढा, त्यात साखर घालून घेतल्यास urine infection होत नाही. तर हिंग व तूप यांची गोळी करून घेतली तर पोटात वात होत नाही.

आजकाल सर्दी, पडसं, खोकला या सततच्या गोष्टी झाल्या आहेत. शरीरातील प्रतिकारशक्ती कमी होतेय. आजकाल काय तर १५ दिवस सर्दी-खोकला तर १५ दिवस पोट बिघडलेले अशा सर्वसाधारणपणे सर्वांच्या तक्रारी असतात. त्यासाठी preventive medicine आवश्यक आहे आणि ते घरातच असतं. असं म्हणतात, 'ज्याच पोट साफ, तो आजारापासून १०० हात लांब.' बरेचसे आजार आहारातल्या खाण्यामुळे होतात. तरुणपणी ॲसिडिटी पचवण्याची क्षमता असते पण जसजसे वय वाढते तशी पचनशक्ती कमी होते. त्यामुळे controlled diet हवा. जशी दशकं पार कराल, तसे आहारावर नियंत्रण आवश्यक. पाणी भरपूर प्या. कमीत कमी १ लीटर पाणी प्रत्येकाने रोज पिणे आवश्यक आहे. 'सांगायचा हेतू' हा की, आजारी पडल्यावर औषधं घेण्यापेक्षा आजारी होऊ नये म्हणून औषध घ्या. हा कळकळीचा सल्ला त्यानी व्याख्यानाची सांगता करताना दिला. उपस्थिताना त्यांचे व्याख्यान खूप आवडले. एकदा त्यांचे व्याख्यान स्वतंत्रपणे २/३ तासांचे ठेवावे अशी सूचनाही काहीनी केली.

आभाराचा भार उपाध्यक्ष श्री. सुरेश देवधर ह्यानी स्वीकारला 'आभार तुमचे कसे मानू, कार्यक्रम तर तुमचाच होता. तुम्ही तो गोड मानून घेतला. हातभार फक्त आमचा होता.' असे नम्रपणे सांगून त्यांनी सर्वाचे आभार मानले. सर्वांना हळदीकुंकू, तीळगूळ आणि अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रमाला ६६ लोक उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता आली.

**– सौ. सरिता मुकुंद देवधर,**

कार्यवाह, देवधर मंडळ.

# पुणे विभागाचा तीळगूळ समारंभ

पुणे विभागाचा तीळगूळ समारंभ रविवार दि. १८-१-२०१५ रोजी दुपारी ४.३० ते ६.३० मध्ये राहुल नगर सोसायटीच्या सभागृहात पार पडला.

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रथितयश लेखक व आकाशवाणी पुणे येथे हिंदी विभाग प्रमुख डॉ. सुनील के. देवधर होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री केशवराजाची पूजा व दीप प्रज्ज्वलन करून झाली.

प्रथम मंडळाचे माजी अध्यक्ष श्री सदाशिव ग. देवधर यांना एक मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. सौ. वसुंधरा पर्वते यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली व अध्यक्ष श्री. पु. गो. देवधर यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

प्रमुख अतिथींना आपले मनोगत व्यक्त करण्याची विनंती केल्यावर त्यांनी त्यांचे शिक्षण झांशी येथे झाल्याने हिंदी भाषेत प्रावीण्य मिळाल्याचे सांगितले. लक्ष्मीव्यायाम मंदीर पासून लेखनास केलेला प्रारंभ, नंतर पुण्यात स्थायिक, आकाशवाणीतील नोकरीमध्ये आलेले अनुभव अशा विविध गोष्टी कथन केल्या.

इंदूरहून आलेल्या श्री. अनिल ढमढेरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ''कोणतीही कार्यकारणी यशस्वी होण्यासाठी किमान ५०% सदस्य चित्तपावन असण्याची गरज आहे.'' असे मत त्यांनी मांडले.

नंतर अध्यक्षांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात कुलवृत्तांविषयी माहिती सांगितली व पुढील पिढीस आपले पूर्वज किती कर्तृत्ववान होते याची माहिती मिळेल. हा कुलवृत्तांत वेबसाईटवर टाकल्यावर जगातील कोणालाही कोठूनही तो पाहता येईल असे सांगितले. मंडळाचे सहकार्यवाह श्री. विजय देवधर यांना पत्रमहर्षी कै. दे. र. भागवत स्मृती पुरस्कार मिळाल्याबद्दल मंडळातर्फे त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री. अजित कुंटे यांचे कथाकथनाचा कार्यक्रम झाला. पु. ल. देशपांड्यांच्या कथा सांगून त्याने उपस्थितांस हसविले. सौ. पर्वते यांनी सर्वांचे आभार मानले.

नाश्ता व चहाचा आस्वाद घेऊन कार्यक्रम सात वाजता संपला. ३५ सभासद कार्यक्रमास उपस्थित होते.

## पत्ता बदलला असेल तर

आपला किंवा आपल्या नातेवाईकांचा, ओळखीच्या कुलबंधू-भगिनींचा पत्ता बदलला असेल तर तो वाटचालकडे जरूर पाठवावा. अपुरा पत्ता अथवा पत्ता सापडत नाही असा शिक्का मारून पोष्टातून परत आलेल्या नावावरील अंक पाठविणे बंद केले जाते.

कृपया पत्ता बदलल्याचे कार्यकारिणी सदस्य श्री. नरेश कृष्णाजी दीक्षित यांचेकडे कळवून मंडळास सहकार्य करावे. त्यांचा पत्ता कार्यकारिणीच्या यादी ज्या पानावर छापली आहे त्यावर आहेच.

अंक पाठविणे थांबविण्यापेक्षा तो योग्य हाती पोहोचविण्यात मंडळास जास्त आनंद वाटतो.

धन्यवाद!

-संपादक

# सुधारित कुलवृत्तांत निवेदन क्र. ४

**– नरेश कृष्णाजी दीक्षित**

सुधारित कुलवृत्तांत बनविण्यासाठी माहिती कशी असावी याची सोदाहरण मिमांसा दिनांक १५-३-२०१४ च्या अंकात प्रथमच केलेली होती. आता तो अंक सर्वांच्या हद्दीत जमा झालेला असेल व प्रत्येक वाटचालच्या अंकात येणारा नमुना फक्त समोर असेल. त्या लेखात निदान ज्यांचेकडे १९९२ साली प्रसिद्ध केलेल्या कुलवृत्तांताची प्रत रद्दीत न जाता शिल्लक असेल तर ती पाहावी व सुधारित माहिती पाठवावी अशी विनंती केलेली होती. समजूया की सर्वांनीच रद्दीत जमा केली, पण निदान जो नमुना समोर असेल तो तरी वाचून, समजून माहिती पाठवावी, तर तेथेही अपेक्षाभंगच. मागच्या लेखात आपणाला देवधरांची फक्त जनगणना करावयाची नसून पूर्ण वृत्तांत द्यावयाचा आहे, याचे भान ठेवण्याचे आवाहन केले होते, त्याचाही प्रभाव दिसत नाही.

या आधीचा अंक डिसेंबर २०१४ च्या अंकात नमुन्यामध्ये थोडी सुधारणा केलेली आहे. ती म्हणजे पत्नी/सुनांसाठी माहेरचे पूर्ण नाव आणि भरीव अक्षरात ''कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचा वेगळा फॉर्म पाठवावा'' अशी सूचना आहे. अनुकरण करावे ही विनंती.

तसेच क्र. ९ हा शिक्षण-दहावी, बारावी, पदवी व विद्यापीठाचे नांव यासाठी आहे. पण अनुभव असा की २०-२२ वर्षाच्या अपत्यांच्या बाबतीत फक्त शिकत आहे एव्हढेच असते. एका पी.एच.डी. महाशयांनी अशीच माहिती पाठविली आहे.

व्यवसाय करत असल्यास कोणता व कसा उभा केला, हे सर्वांना समजणे अपेक्षित असते तर नोकरी करत असाल तर कधी व कोठे-कोठे केली तेही अपेक्षित आहे.

नमुन्यामध्ये क्र. ११ - काही महत्त्वाच्या उपलब्धी व १२ इतर खास लिहिण्यासारखे - साठी अत्यंत मर्यादित जागा ठेवलेली आहे, जेणेकरून माहिती पाठविणारा त्यासाठी निराळ्या कागदाचा खर्च करील. म्हणूनच झेरॉक्स काढून त्यावर भरून पाठवू नये अशी सूचना आहे. पण ती कोणी वाचतच नाही. सरसकट झेरॉक्स कागद असतात. तो कागदही स्वीकारावयास हरकत नाही. पण माहितीच्या बाबतीत तरी कवडीचुंबक तत्त्व कशासाठी? माहिती कागदाच्या मागच्या बाजुलाही लिहिता येईल.

काही जणांनी २००५ साली संकलित करुन ठेवलेली माहिती सुद्धा पाठविली आहे. आता १० वर्षानतर त्यात फरक पडणार नाही का ? की तशीच छापायला द्यायची? संकलक म्हणून मी किती पुरा पडणार? माहिती पाठविण्याचा प्रतिसाद म्हणावा तर त्रैमासिक घरपोच झाल्यावर १०-१५ जणांकडून माहिती पोहोच होते. ती वाचल्यावर, वर लिहिलेल्या गोष्टींमुळे अपेक्षाभंगाचे दु:ख सहन करावे लागते ते निराळेच. आता हे रडगाणे पुरे करतो आणि माहिती कशी असावी याचा खुलासा करतो.

माहिती देताना स्वत:च्या नावानंतर आजोबा, पणजोबा यांची नावे द्यावी जेणेकरुन आपणांस पान नंबर माहिती नसेल तर शोध घेता येईल. माहितीत आई, वडील, स्वत:, पत्नी,

(पान ७ वर........

# आपला अर्थसंकल्प - काही महत्त्वाचे मुद्दे

– अकल्पिता चिंतामणी देवधर

दि. २८/२/१५ रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पात इन्कमटॅक्सचे दर न बदलता अर्थमंत्र्यांनी करदात्यांसाठी करवजावटीच्या रकमेत बदल केला आहे.

जर ह्याकडे अधिक व्यापक दृष्टीने पाहिले तर लक्षात येईल की याद्वारे आपली करप्रणाली अधिकाधिक सुधारणे व त्याच सोबत कराची व्याप्ती वाढवणे तसेच गुंतवणूक व करसवलतीबरोबर इनडायरेक्ट टॅक्सच्या रुपाने करदात्यांना फारशी झळ न लागू देता, सरकारला अधिक उत्पन्न मिळवून देण्याचा खूप चांगला प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केलेला आहे.

वैयक्तिक करदात्यांसाठी अर्थमंत्र्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या खालील प्रमाणे आहेत.

हेल्थ इन्शुरन्स प्रिमियम अर्थात मेडिक्लेम इन्शुरन्स प्रिमियम जो आतापर्यंत रु. १५,०००/- वार्षिक वजावट इतका होता तो आता रु. २५,०००- एवढा मिळू शकतो. त्याचप्रमाणे वरिष्ठ नागरिकांसाठी ही मर्यादा रु. २०,०००/- वार्षिक वरून रु. ३०,०००/- वार्षिक एवढी असू शकते.

तसेच वरिष्ठ नागरिकांसाठी (८० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या व्यक्ती) ज्यांना हेल्थ इन्शुरन्स मिळ शकत नाही त्यांच्यासाठी रु. ३०,०००/- पर्यंतचा उपचारांवर केलेला खर्च एवढी करसवलत मिळू शकते.

त्याचप्रमाणे काही विशिष्ट आजार (जसे कर्करोग) यांवरील उपचारांवरील सवलत जी आतापर्यंत रु. ६०,०००/- होती ती आता रु. ८०,०००/- वार्षिक एवढी असेल.

तसेच अपंग व्यक्तिंकरिता असलेली रु. ५०,०००/- एवढी सवलत वाढवून ती रु. ७५,०००/- एवढी करण्यात आळी आहे.

त्याचप्रमाणे अपंगत्व जर अतिशय गंभीर स्वरुपाचे असेल तर तीच सवलत रु. १ लाख वरून रु. १.२५ लाख वार्षिक एवढी असेल.

इन्कम टॅक्स च्या ८० सी खालील मिळणाऱ्या वजावटीमध्ये पीपीएफ, एलआयसी प्रिमियम याप्रमाणेच मुलींसाठी सुरू केलेल्या सुकन्या समृद्धी या योजनेतील गुंतवणुकीचा सुद्धा विचार करण्यात येईल आणि या योजनेतील रक्कम ही टॅक्स फ्री असेल.

पेन्शन फंड किंवा नवीन पेन्शन योजनेअंतर्गत असलेली वजावट ही रु. १ लाख वार्षिक वरून रु. १.५ लाख वार्षिक एवढी असेल. त्यानुसार इन्कमटॅक्स ॲक्टच्या सेक्शन ८० सीसीडी अंतर्गत रु. ५०,०००/- एवढी अधिक वजावट मिळू शकते.

प्रवासभत्याची सवलत वाढवून रु. ८००/- प्रति महिना ऐवजी रु. १६००/- प्रति महिना करण्यात आली आहे. म्हणजेच ही सवलत आता रु. १९,२००/- वार्षिक एवढी असेल.

ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या उत्पन्नाचा पहिल्या तीन लाख रुपयांवर एकही पैसा आयकर भरावा लागणार नाही.

थोडक्यात, करप्राप्त उत्पन्नावर नवीन करसवलत खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| Ded u/s 80C | Rs. | 1,50,000/- |
| 80CCD | Rs. | 50,000/- |
| 80D | Rs. | 25,000/- |
| (Health Insurance Premium) | | |
| Ded. on account of interest on | | |
| House property loan | Rs. | 2,00,000/- |
| Exemptionof Transport allowance | Rs. | 19,200/- |
| | Rs. | 4,44,200/- |

बऱ्याच लोकांकडून ऐकायला मिळाले की हे कॉर्पोरेट बजेट आहे. कारण उद्योगांना खूप सवलती आहेत. तसेच त्यांचा कराचा दर देखिल कमी होत आहे. मात्र हे लक्षात घ्यायला हवे की हा कॉर्पोरेट टॅक्स जो ३०% वरुन २५% करण्यात आला आहे तो ह्या वर्षाकरिता नाही तर पुढील ४ वर्षांकरिता आहे व तो देखिल टप्याटप्याने कमी होईल. एकदम नाही. मात्र त्याचबरोबर त्यांच्यावर वाढीव कर (सरचार्ज) लावण्यात आला आहे. तो मात्र ह्याच वर्षापासून अंमलात येईल.

शेवटी वैयक्तिक करदात्यांवर जास्त भर न पडू देता सुद्धा सरकारला देशाची तिजोरी भरण्यासाठी काही पावले उचलावी लागणारच. आपल्याला आपले एक घर चालविताना खर्च कसा मॅनेज करावा यासाठी बरीच गणिते मांडावी लागतात; मग सरकारला तर संपूर्ण देश चालवायचा आहे, आणि ते नक्कीच सोपे नाही. नाही का? मग आम्हाला एवढी कमी सवलत का असा विचार करण्यापेक्षा जे आहे त्यातून जास्तीत जास्त आपल्या बाजुने कसे वळविता येईल त्याचा विचार केला तर? ***

....पान ५ वरून)

मुले, बहिणी, आत्या यांची पूर्ण माहिती द्यावी. तसेच भावंडांचे पत्ते व फोन नंबर निराळ्या कागदावर लिहून पाठवावेत. शिक्षण, व्यवसाय, नोकरी यांची विस्तृत माहिती लिहावी. पत्नी व सुनांच्या माहेरचे नाव वडिलांचे पूर्ण नाव लिहावे. मुली व आत्यांचे माहेरचे व सासरचे नाव जावयांच्या पूर्ण नाव पत्यासह लिहावे. बस एव्हढीच अपेक्षा आहे. सुमारे १९९० सालानंतर मृत झालेल्या कुटुंबियांची माहितीही पाठवावी.

## आता सुधारित कुलवृत्तान्तासाठी सुधारित आवाहन

आपल्या देवधर मंडळाची स्थापना ४ फेब्रुवारी १९६८ रोजी झाली असली तरी कुलवृत्तान्ताचे प्रथम प्रकाशन १० एप्रिल १९६७ रोजी आणि बरोब्बर २५ वर्षांनी दुसरी सुधारित आवृत्ती १८ ऑक्टोबर १९९२ रोजी प्रकाशित झाली. आता कुलवृत्तान्ताचे सुर्वण महोत्सवी वर्ष २०१७ साली येईल, तेव्हा आपली तिसरी सुधारित आवृत्ती प्रसिद्ध होणे आपणासर्वांस अभिमानास्पद आणि आनंददायक असेल. दुसऱ्या सुधारित आवृत्तीच्या प्रस्तावनेत मा. कै. लक्ष्मण विश्वनाथ दीक्षित यांनी असे लिहून ठेवले आहे कि त्या ग्रंथाच्या (कुलवृत्तांत) लिखाणाचे खरे काम जून १९८५ नंतर सुरू झाले. याचा अर्थ त्याच्या प्रथम वितरणासाठी सुमारे सात वर्षांचा कालावधी लागला. आताच्या सुधारित आवृत्तीसाठी एव्हढा नसला तरी दीड-दोन वर्षांचा कालावधी निश्चितच लागू शकतो. या गोष्टीचे भान, निदान ज्यांचेकडे वाटचालचा अंक येतो त्यांनी ठेवल्यास माहितीचा ओघ वाढेल अशी अपेक्षा धरून, वाट पाहतो...

***

# मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या शैक्षणिक मदतीसंदर्भात

नेहमीप्रमाणे २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता मंडळाच्या नियमाप्रमाणे गरजू/हुशार कुल विद्यार्थ्यांना (मुले-मुली) शैक्षणिक मदत देण्यात येईल. त्यासाठी साध्या कोऱ्या कागदावर अर्ज करावे.

१) विद्यार्थ्यांचे नाव
२) गेल्यावर्षीचे गुणपत्रक (झेरॉक्स)
३) शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यालयाचे/महाविद्यालयाचे/शिक्षण संस्थेचे मूळ बोनाफाईड सर्टिफिकेट
४) पालकांच्या उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अर्जात खालील सदरांसह आपली पूर्ण माहिति लिहावी.

✼ पालकाचे नांव/पत्ता (पिन कोड/टेलिफोन नंबरसह)
✼ विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनींचे पूर्णनांव / पत्ता / जन्मदिनांक
✼ यंदा प्रवेश घेतलेली इयत्ता
✼ पालकाचे वार्षिक उत्पन्न
✼ पालकाच्या उत्पन्नाच्या दाखल्याऐवजी दोन स्थानिक प्रतिनिधींच्या किंवा दोन आजीव सभासदांच्या शिफारशी (घरांतील/नात्यातील आजीव सभासदांखेरीज)
✼ अगोदरच्या २०१४-१५ साली मिळालेले गुण.
✼ बँक खाते क्रमांक (अंकी शिवाय अक्षरी) बँकेचे नाव व शाखेचे नाव
✼ पालकांची स्वाक्षरी,
✼ तारीख (अवश्य)

अशा तऱ्हेने परिपूर्ण अर्ज १ जुलै २०१५ ते दि. २० ऑगस्ट २०१५ या कालावधीत साध्या पोष्टाने कार्यवाह सौ. सरिता देवधर यांचेकडेच पाठवावेत. हस्ते परहस्ते पाठवू नयेत.

अपूर्ण व उशिरा मिळालेल्या अर्जांवर विचार केला जाणार नाही. काही तांत्रिक कारणाने (निकालास उशीर इ.) सदर तारखेपूर्वी अर्ज पाठविता येत नसल्यास आगाऊ लेखी कळविणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे सर्व माहिती एकत्रित न आल्यास मदत पाठवणे शक्य होणार नाही.

पत्ता : सौ. सरिता मुकुंद देवधर (कार्यवाह)
११ रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६
गिरगांव, मुंबई ४. दूरध्वनी ०२२-२३८५४८११

# हार्दिक अभिनंदन

## ✼ श्री. विजय गंगाधर देवधर

मंडळाचे सहकार्यवाह श्री. विजय गंगाधर देवधर (कु.वृ. पान ३२४) यांना मराठी साहित्य रसिक मंडळ चेंबूर यांनी आयोजित केलेल्या वृत्तपत्रलेखन स्पर्धा वृत्तपत्रलेखन स्पर्धा २०१४ मध्ये निवडणूक या विषयावरील पत्रास पत्रमहर्षी कै. दे. र. भागवत स्मृति वृत्तपत्रलेखन पुरस्कार २०१४ प्राप्त झाला आहे.

## ✼ श्री. अजय विजय देवधर

मंडळाचे आजीव सदस्य श्री. अजय विजय देवधर (पान ३२५) यांनी क्यू लाईफ चँपियनशिप सिरीज इनडोअर लीग २०१५ आंतरकचेरी (आय टी कंपन्या) कॅरम स्पधेत एकेरी गटात उपविजेतेपद तर दुहेरी गटात विजेतेपद मिळविले आहे.

## ✼ सौ. अनघा अजय देवधर

मंडळाच्या आजीव सदस्या सौ. अनघा अजय देवधर कॉसमॉस बँक आणि रिलायन्स तर्फे कॉसमॉस प्रिमियर लीग मधील नेत्रवेधक कामगिरीबद्दल विशेष ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

या तीनही यशस्वी कुलबंधु-भगिनींचे मंडळातफे हार्दिक अभिनंदन!

# आपण यांना अंतरलो

| क्र. | नाव | कु.वृ.पान नं. | गाव | निधनाची दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | बिग्रेडीअर सुरेश विष्णू देवधर | २२५ | कोल्हापूर | १५/५/२०१३ |
| २) | विश्वनाथ परशुराम देवधर | | मुलुंड | ८/८/२०१३ |
| ३) | विजया लक्ष्मण रानडे (देवकी प. दीक्षित) | ७९७ | विलेपार्ले | ३/९/२०१३ |
| ४) | डॉ. विद्याधर रामचंद्र देवधर | | पनवेल | १८/१२/२०१३ |
| ५) | शरद सदाशिव देवधर | | डोंबिवली | २६/१२/२०१३ |
| ६) | कमला अच्युत देवधर | १९८ | चिपळूण | १८/१/२०१४ |
| ७) | श्रीपाद गोपाळ देवधर | ८१७ | मुलुंड | २४/१/२०१४ |
| ८) | माधव दत्तात्रय देवधर | १८६ | पुणे | १५/२/२०१४ |
| ९) | वामन लक्ष्मण देवधर | ८०४ | चिपळूण | ८/३/२०१४ |
| १०) | गजानन सीताराम दीक्षित | ७०५ | अंधेरी | ११/३/२०१४ |
| ११) | विजया हरी देवधर | ८६४ | पुणे | ८/४/२०१४ |
| १२) | शरद चिंतामण देवधर | ३०७ | पुणे | १९/३/२०१४ |
| १३) | लक्ष्मी रामचंद्र कानेटकर | ५१३ | गिरगाव | ४/५/२०१४ |
| १४) | उर्मिला रविश देवधर | | चिपळूण | १२/८/२०१४ |
| १५) | संजीवन गजानन देवधर | ३८० | अहमदाबाद | १४/३/२०१४ |
| १६) | सुरेश विठ्ठल देवधर | | डोंबिवली | १८/९/२०१४ |
| १७) | केशव विष्णू देवधर | ४९९ | माहीम | २२/१०/२०१४ |
| १८) | शंकर रामचंद्र देवधर | ४१९ | वाई | ३/११/२०१४ |
| १९) | सदाशिव गजानन देवधर | | डोंबिवली | १३/११/२०१४ |
| २०) | विजया शामराव सहस्रबुद्धे (विजया दत्तात्रय देवधर) | १९५ | अमरावती | १३/१०/२०१४ |
| २१) | प्रमिला ढमढेरे | | उज्जैन | १४/१२/२०१४ |
| २२) | सुषमा दत्तात्रय देवधर | | पुणे | १७/९/२०१२ |
| २३) | विश्वनाथ श्रीधर तथा बंडोपंत देवधर | | तासगाव | २२/११/२०१४ |
| २४) | नरहरी प्रभाकर देवधर | ४४९ | नालासोपारा | २१/१/२०१५ |
| २५) | उषा यशवंत देवधर | ६१८ | गोरेगाव | १०/२/२०१५ |
| २६) | इंदिरा कृष्णाजी दीक्षित | ७२४ | | २२/२/२०१५ |
| २७) | सौ. गौरी विजय देवधर | ३२४ | पुणे | २७/२/२०१५ |
| २८) | दत्तात्रय सीताराम दीक्षित | ७४९ | बोरिवली | २७/२/२०१५ |
| २९) | डॉ. श्रीराम बाळकृष्ण देवधर | | घाटकोपर | |

दु:खितांचे दु:खात देवधर मंडळ सहभागी आहे.

# कुलवृत्तांताच्या नवीन आवृत्तीसाठी पुरवणी माहिती

(टीप : विवाह झालेल्या मुला/मुलींसाठी वेगळा फॉर्म वापरावा)

मजकूर पाठवितांना तो या क्रमाने येणे अपेक्षित आहे. या फॉर्मची झेरॉक्स काढून त्यावर भरून पाठविणे नाही. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिचा वेगळा फॉर्म पाठवावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कुलवृत्तांत पान नं.<br>घराणे | |
| १) नांव | स्वत:चे | वडिलांचे/पतीचे नांव | आडनांव | |
| माहेरचे नांव (महिलांसाठी) | स्वत:चे | वडिलांचे | आडनांव | |
| २) वडिलांचे नांव | वडिलांचे | आजोबांचे | आडनांव | |
| ३) पती/पत्नीचे नांव | नांव | वडिलांचे | आडनांव | |
| ४) पती/पत्नीच्या वडिलांचे | नांव | वडिलांचे | आजोबांचे | आडनांव |
| ५) पूर्ण पत्ता : घर नं. | इमारत | रस्ता | | |
| तालुका | जिल्हा | राज्य | | |
| पिन | मोबाईल | | | |
| ६) फोन नं. कार्यालय | | | घर | |
| ७) जन्मदिनांक (........./........../.............) ठिकाण (गांव) | | | शहर | |
| राज्य | | पिन | देश | |
| ८) विवाहाची तारीख (........../.........../..............) | | | | |
| ९) शिक्षण (दहावी / बारावी / पदवी वगैरे) | | | विद्यापीठ | |
| १०) व्यवसाय | | | | |
| ११) काही महत्त्वाच्या उपलब्धी (माहिती सविस्तर लिहावी) | | | | |
| १२) इतर खास लिहिण्यासारखे (माहिती सविस्तर लिहावी) | | | | |
| १३) अपत्य (मुलगा/मुलगी) नांव जन्म दिनांक (........../.........../..............) | | | | |

फॉर्म पाठविण्याचा पत्ता :

श्री. नरेश कृष्णाजी दीक्षित (कु.वृ.पान ७२५)

ब/९, ॐ भैरवी सोसायटी, सम्राट हॉटेल बिल्डिंग, पं. दीनदयाळ मार्ग, डोंबिवली (प.) ४२१२०२, जि. ठाणे (महाराष्ट्र) फोन : ०२५१- २४८८७३६ मोबाईल : ९८२०४६७७४२ email : nareshdixit1949@gmail.com

### देवधर मंडळाचा चालता बोलता 'संदर्भ ग्रंथ'

# आमचे वि. शं.

– रा. वा. देवधर, गिरगांव, मुंबई

*देवधर मंडळाच्या कार्यक्रमांना होत असलेली सध्याची उपस्थिती पाहता मंडळ ज्या देवधर मंडळींसाठी तयार केले गेले त्यांनाच त्याची काहीही किंमत नाही असेच म्हणावेसे वाटते. ज्यावेळी मंडळ स्थापन झाले त्यावेळच्या कार्यकारिणीने ते वाढविण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यावेळच्या कार्यकारिणीतील एक सदस्य म्हणजे वि. शं. देवधर. त्यांनी मंडळाच्या वाढीसाठी जे काही केले त्याचे वर्णन वाटचालच्या वर्ष १ अंक ३ अर्थात दिनांक ८ जुलै १९९० च्या अंकातील गिरगावच्या श्री. रा. वा. देवधर यांच्या लेखात वाचायला मिळाले. तो लेख वाचनात आला आणि तातडीने या अंकात पुनर्मुद्रित करावा असा विचार मनात आला. निदान लेख वाचून नवीन एखाद्याला मंडळासाठी काही करावेसे वाटले, एखाद्या कार्यक्रमाला यावेसे वाटले तर त्याचे श्रेय वि. शं. सारख्या अनेकांनी केलेल्या मेहनतीला मिळेल.*

*टीप : लेख ज्या वि. शं. देवधरांवर आहे, त्यांचे चिरंजीव श्री. सुरेश विश्वनाथ देवधर हे सुद्धा मंडळाचे कार्य गेली अनेक वर्षे करीत आहेत. सध्या ते मंडळाचे उपाध्यक्ष आहेत.*

विश्वनाथ शंकर देवधर पोर्ट-ट्रस्टमध्ये डॉक्स डिपार्टमेंटमध्ये होते. तेथून सेवानिवृत्त होताना त्यांनी निवृत्तीवेतन न घेता भविष्य निर्वाह निधी स्वीकारला. याचे आश्चर्य वाटावयास नको. कारण आमच्या वि. शं. यांना दम्याच्या विकाराने दुबळे बनविले होते. पण त्यांची जिद्द आणि मनाचा दृढनिश्चय यांच्या जोरावर त्यांनी देवधर मंडळाचे काम निरलसपणे आणि प्रामाणिकपणे सुमारे २५ वर्षे काम केले. देवधर मंडळाचे अकराशे - बाराशे आजीव सदस्य आहेत. त्यातील निम्याहून अधिक सदस्य वि. शं. नी केलेले आहेत. हे त्यांना अत्यंत भूषणावह असून आम्हा सर्वांना कौतुकास्पद आहे. देवधर मंडळाचे कार्य हे वर्धमान आणि विकसनशील आहे, हे विसरून चालता येत नाही. १९६४ साली डॉ. वा. रा. ढमढेरेंना त्यांनी पत्र पाठवून आपण देवधर कुलवृत्तांताच्या कार्यात मन:पूर्वक सामील होत असल्याचे कळविले आणि प्रत्यक्ष कार्याला आरंभ केला. कोणतेही काम त्यांनी नाकारले नाही. कोणतीही जबाबदारी टाळली नाही.

देवधर मंडळाचे काम त्यांना संजीवनीसारखे जीवनदायी आणि सुखदायी ठरले. घरच्या काळज्या, चिंता आणि अडचणी याचा त्यांनी कधी बाऊ केला नाही. वि. शं. च्या धर्मपत्नी नेहमी हसतमुख व सर्वांचे स्वागत करावयास तयार असल्याने वि. शं. ना घरातून सामाजिक कार्यासाठी उत्तेजनच मिळाले. देवधर तितुका मेळवावा, देवधर मंडळाला आकार द्यावा अशी त्यांची कार्यपद्धती होती. अडलेल्यांना पुढचा मार्ग दाखवावा, अडचणी असल्या तर त्यावर मात करावी, सगळ्यांचे प्रेम आणि सहकार्य घ्यावे आणि कार्यपूर्ती करावी ही त्यांची

कार्यपद्धती अनुकरणीय नाही असे कोण म्हणेल?

पोर्टट्रस्टमध्ये असताना त्यांचा मुलगा सुरेश सी. ए. झाला आणि सूनबाई सौ. सुनंदा डेंटल सर्जन झाली. बोरिवलीला मोठा जागा, गाडी, टेलिफोन सर्व सुखाची साधने उपलब्ध झाली. त्यांचे दोन नातूही हुषार आहेत. अशी सर्व अनुकूलता असताना त्यांनी देवधर मंडळाच्या कामातून अंग काढून घेतले नाही. याचे कारण ते देवधर मंडळाशी एकरूप झाले आहेत.

आजपर्यंत देवधर मंडळाच्या १९-२० सहली छोट्या - मोठ्या झाल्या. त्यात त्यांनी मोठ्या हौसेने भाग घेतला. सहलींची वर्णने वाचावयास देऊन देवधर मंडळींना सहलीची गोडी लावली. असे हे आमचे वि. शं. देवधर परवा आमच्याकडे स्वत: आले होते. म्हणाले, ''रामभाऊ आम्ही गिरगावात होतो तेव्हा आठ-पंधरा दिवसानी तरी आपली गाठभेट होत असे. पण आता बोरिवलीला गेल्यापासून आपली गाठभेट होत नाही. त्यामुळे आम्हा सर्वांना अगदी चुकल्या चुकल्यासारखे वाटते.''

एकदा त्यांचा बोरिवलीहूनच फोन आला होता. म्हणाले, ''मी नुकताच नाशिकला जाऊन आलो. तेथील देवधर मंडळी सर्व प्रकारचे सहकार्य देण्यास तयार आहेत. देवधरांची संख्याही बरीच आहे. देवधर मंडळींपैकी बरीच मंडळी नावारुपाला आलेली आहेत. नाशिकला देवधर मंडळाची शाखा काढली तरी चालण्यासारखे आहे. सर्वांचे सहकार्य मिळेल. पण त्यांना तरुण आणि कर्तबगार कार्यकर्ते मिळणे कठीण आहे.'' एका दमात वि. शं. म्हणाले. मी त्यावर म्हणालो, ''वि. शं. तुमच्यासारखी कार्यतत्पर मंडळी हजारांतून एखदीच होणार.''

वि. शं. म्हणाले, ''रामभाऊ तसे म्हणणे म्हणजे नवीन पिढीचा एकप्रकारे अवमान करण्यासारखेच होईल. नवीन नवीन तरुण मंडळी पुढे येत आहेत, त्यांना आपण मार्गदर्शन केले पाहिजे.''

वि. शं. नी आपल्या जागत्या आणि प्रेरक उदाहरणाने नवीन होतकरू देवधर बंधु-भगिनींपुढे आदर्श ठेवलाच आहे. असे आदर्श, निरलस आणि एकनिष्ठ वि. शं. दोनचार जरी निर्माण झाले तरी देवधर मंडळाच्या कार्याला पुष्कळ गती मिळेल. यथाशक्ती, यथामती आणि यावत्‌शक्य आपण सहकार्याचा हात देवधर मंडळाला दिला पाहिजे हीच वि. शं. ची अपेक्षा!